फौ. कि. अर्ज क्रं. ५४८/२०२२.

| CNR No. MHPU- 2300-2625-2022 | अरुणा वि. दत्तात्रय |
|---|---|

## आदेश निशाणी क्रमांक ११ वर

जाबदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार यांनी मुळ अर्ज वाढीव पोटगीकरीता दाखल केला आहे. मुळ अर्जामध्ये जाबदार यांनी दि. २०/१२/२०२४ रोजी वकिलपत्र दाखल करुन हजर झाले आहेत. जाबदार यांच्याकडे जबाब देणेकामी कागदपत्र उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी त्यांचे म्हणणे मुदतीत दाखल केले नाही. कागदपत्र उपलब्ध न झाल्यामुळे जाबदार यांना विलंब झालेला आहे. जाबदार यांना त्यांचा जबाब दाखल करण्यास ९० दिवसांचा विलंब झाले असल्यामुळे तसेच, सदरचे अर्ज जर नामंजूर झाल्यास तर जाबदार यांचे नुकसान होणार आहे. तरी जाबदार यांचे सदरचे अर्ज मंजूर करण्यात यावे अशी विनंती जाबदार यांनी केले आहे.

२. अर्जदार यांनी नि. क्र. १३ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर अर्जावर हरकत घेतली आहे. अर्जदार यांनी पुढे असे अभिकथन केले आहे की, अर्जदार यांचे मुळ अर्ज क्रं. ५३/१९९४ चा निकाल दि. १५/०७/१९९६ रोजी झाले आहे. सदरचे अर्ज मंजूर होवून त्यात अर्जदारास दरमहा रक्कम रुपये १००/– पोटगी मंजूर झाली आहे. त्यानंतर अर्जदार यांनी वाढीव पोटगीसाठी फौजदारी किरकोळ अर्ज क्रं. ५३/२००१ दाखल केला होता. सदर अर्जाचे निकाल दि. २२/११/२००२ रोजी होवून त्यात दरमहा रक्कम रुपये

**फौ. कि. अर्ज क्रं. ५४८/२०२२.**

२००/– पोटगी अर्जदार यांना मंजूर झाली आहे. अर्जदार यांनी त्यांचे फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ५३/२००१ दाखल केल्यानंतर सदरचा अर्ज सुमारे २० वर्षानंतर दाखल केले आहे. जाबदार हे अर्जदार यांना त्रास देण्याच्या उद्देशाने सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे. सबब, जाबदार यांचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती अर्जदार यांनी केले आहे.

३. युक्तिवाद ऐकला. अर्ज व म्हणणे वाचले. जाबदार यांचे अर्जानुसार त्यांना आवश्यक कागदपत्र उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना सदरचे अर्ज दाखल करण्यास ९० दिवसांचा विलंब झाले आहे. परंतू येथे महत्वाची बाब अशी आहे की, जाबदेणार यांनी त्यांच्या अर्जामध्ये आवश्यक कागदपत्राबाबत कोणतेही सखोल कथन केले नाही. यावरुन, असे दिसून येते की, जाबदेणार यांनी जाणुनबूजून मुळ अर्जामध्ये त्यांचे म्हणणे दाखल करण्यासाठी ९० दिवसांचा विलंब केला आहे. सबब, मुळ अर्जाचा विचार करता नि.क्र. ११ कडील अर्ज रक्कम रुपये १,०००/– (रक्कम रुपये एक हजार) अर्जदार यांना देण्याच्या अटीवर व शर्तीवर मंजूर करण्यात येते.

JYOTIMALA C GUPTA
Digitally signed by JYOTIMALA C GUPTA
Date: 2025.06.21 15:49:00 +0530

खेड–राजगुरुनगर
दि. २१/०६/२०२५

**(श्रीमती. जे. सी. गुप्ता)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी खेड–
राजगुरुनगर. जि. पुणे.